महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/अ/कंत्राटी/वेतन/३२४८५ दिनांक : १४/१०/२०२४

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनी अंतर्गत कंत्राटदारांमार्फत कार्यरत बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना दि. ०१ एप्रिल २०२४ पासून सध्याचा मूळ वेतनामध्ये (बेसिकमध्ये) १९% वाढ करणेबाबत.

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२५९६ दि. १३/०८/२०१९.
२. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१२६/ऊर्जा-२, दि. २४/०९/२०२४.
३. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१२६/ऊर्जा-२, दि. १४/१०/२०२४.

***********

शासनाचे उप सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. २४ जुलै - २०१९ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - ल मध्ये प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकानुसार मुंबई दुकाने व आस्थापना उद्योगातील अनुसूचिकरिता किमान वेतन अधिनियम - १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतनाचे दर दि. २४/०७/२०१९ पासून पुर्ननिर्धारित केलेले आहेत. त्यानुसार संदर्भीय परिपत्रक क्र. ०१ अन्वये महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन दि. २४/०७/२०१९ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

२. मा. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री महोदय, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) तथा व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. आणि मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती यांच्या उपस्थितीत दि. ०९/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत तिन्ही कंपन्यांमध्ये कंत्राटदारांमार्फत कार्यरत बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाकडून मुंबई दुकाने व आस्थापना अनुसूचि अंतर्गत सुधारित किमान वेतनाची अधिसूचना जारी होईपर्यंत किमान मूळ वेतनाच्या (बेसिकच्या) १९% इतकी वाढ देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येऊन उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार बैठकीचे इतिवृत्त अंमलबजावणीसाठी या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

३. सदर विषयाच्या अनुषंगाने आता उपरोक्त संदर्भ क्र. ०३ अन्वये, कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांनी त्यांचे पत्र दि. १४/१०/२०२४ नुसार कंपनीतील बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांना सद्यस्थितीत लागू असलेल्या किमान वेतनामध्ये दि. ०१ एप्रिल २०२४ पासून मात्र मूळ वेतनामध्ये (बेसिकमध्ये) १९% वाढ करण्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.

४. त्यानुषंगाने, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) व संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन कंपनीमधील कंत्राटदारामार्फत कार्यरत बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांना सद्यस्थितीत लागू असलेल्या किमान वेतनामध्ये दि. ०१ एप्रिल २०२४ पासून मात्र मूळ वेतनामध्ये (बेसिकमध्ये) १९% वाढ करण्यास मंजूरी दिलेली आहे.

५. विद्यमान पूरक भत्त्याच्या रक्कमेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

६. तसेच भविष्यात महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाकडून मुंबई दुकाने व आस्थापना अनुसूचि उद्योगातंर्गत सुधारित किमान वेतनाची अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी अधिसुचना निर्गमित झाल्याच्या तारखेपासूनच करण्यात येईल.

७. महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोत कंत्राटीपध्दतीने कार्यरत कामगारांच्या मूळ वेतनामध्ये दि. ०१ एप्रिल २०२४ रोजीपासून १९% इतकी वाढ केल्यास परिमंडळनिहाय मूळ वेतन खालीलप्रमाणे राहील.

| कामगारांची वर्गवारी | परिमंडळ - १ | | परिमंडळ - २ | | परिमंडळ - ३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मूळ वेतन | पूरक भत्त्याची रक्कम | मूळ वेतन | पूरक भत्त्याची रक्कम | मूळ वेतन | पूरक भत्त्याची रक्कम |
| कुशल | १३,८४२/- | २,३२६/- | १३,१३३/- | २,२०७/- | १२,४२४/- | २,०८८/- |
| अर्धकुशल | १२,९१९/- | २,१७१/- | १२,२०९/- | २,०५२/- | ११,५००/- | १,९३३/- |
| अकुशल | ११,९२५/- | २,००४/- | ११,२१६/- | १,८८५/- | १०,५०५/- | १,७६६/- |

८. सर्व संबंधित कार्यालयांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, आपल्या अखत्यारित कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोत कंत्राटीपध्दतीने कार्यरत कामगारांना दि. ०१ एप्रिल २०२४ पासून वरीलप्रमाणे मात्र मूळ वेतनामधे वाढ माहे ऑक्टोबर -२०२४ च्या मासिक वेतनापासून लागू करण्यात यावी. माहे एप्रिल- २०२४ ते माहे सप्टेंबर -२०२४ या कालावधीमधील देय रक्कम माहे ऑक्टोबर -२०२४ मध्ये कंत्राटदारामार्फत अदा करण्यात यावी.

९. सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

**(संजय रा.ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत :**
प्रेषण यादी प्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.